**SNBP International & Senior Secondary School, Chikhali, Pune.**
**Affiliation No. 1130703**
**Academic session 2024-25** **std.8th**
**NOTES-10 (TERM-II)**
**Subject - Marathi**

**Prepared by: Renuka Joshi** **LESSON- १०.खंबीर ते हंबीर**

**पूर्व उपक्रम** – तानाजी मालुसरेंची कामगीरी व जीवनकार्य लिहा.

**शब्दार्थ.** १.पराभूत - हरविणे २. शौर्य - पराक्रम

३.कन्या - मुलगी ४. मुख्य - प्रमुख

५. पायथा - तळाची बाजू ६. निष्णात - तरबेज

**वाकप्रचार**.

१. हैराण करणे - त्रास देणे. २. बहाल करणे - सन्मान करणे,पद देणे.

३. खंबीरपणे उभे राहणे - ठामपणे वागणे ४. वीरमरण पत्करणे - शूरपणे मृत्यूला सामोरे जाणे.

**प्रश्न १. पुढील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. सर सेनापती हंबीरराव यांचे मूळ नाव काय होते?
**उत्तर** - सर सेनापती हंबीरराव यांचे मूळ नाव 'हंसाजी'असे होते.

२. सर सेनापती हंबीरराव यांचा जन्म कोठे झाला?
**उत्तर** - सर सेनापती हंबीरराव यांचा जन्म सातारा जिल्ह्यातील कराड तालुक्यातील तळबीड येथे झाला.

३. छत्रपती शिवाजी महाराज यांनी त्यांना कोणती पदवी बहाल केली?
**उत्तर** - छत्रपती शिवाजी महाराज यांनी त्यांना 'हंबीरराव' ही पदवी बहाल केली.

४. सर सेनापती हंबीरराव यांची शेवटची लढाई कोठे झाली?
**उत्तर** - सर सेनापती हंबीरराव यांची शेवटची लढाई वाईजवळ केंजळगडच्या पायथ्याशी झाली.

**प्रश्न २. पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

१. छत्रपती शिवाजी महाराज आणि सर सेनापती हंबीरराव यांच्या नातेसंबंधाविषयी माहिती लिहा.
**उत्तर** -सर सेनापती हंबीरराव यांची बहीण सोयराबाई या छत्रपती शिवाजी महाराजांच्या दुसऱ्या पत्नी होत्या.संभाजी महाराजांचे ते मामा होते.राजे संभाजी महाराजांचे सावत्र भाऊ राजाराम यांच्याशी हंबीरराव मोहिते यांच्या कन्या महाराणी ताराराणी यांचे लग्न झाले होते.

२. छत्रपती शिवाजी महाराजांनी 'हंबीरराव'ही पदवी का बहाल केली होती?
**उत्तर** -हंबीरराव मोहिते हे निर्णय घेणे आणि पराक्रम गाजवणे यात निष्णात होते.छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेल्या स्वराज्यातील ते १६७४ पर्यंत सेनापती होते.त्यावर्षी विजापूरच्या सैन्याशी स्वराज्याचे मुख्य सेनापती प्रतापराव गुजर यांना युद्धात वीरमरण आले.स्वराज्यातील सैन्याची फाटाफूट व्हायला लागली.अशावेळी आपल्या स्वतंत्र निर्णय क्षमतेच्या जोरावर सेनापती हंबीरराव मोहिते यांनी हिमतीने पाठलाग करणाऱ्या शत्रू सैन्यावर जोरदार हल्ला चढवला आणि मोगलांना पराभूत केले.यात त्यांनी गाजवलेल्या शौर्यामुळे खुश होऊन छत्रपती शिवाजी महाराजांनी त्यांना 'हंबीरराव'ही पदवी बहाल केली.

३. सरसेनापती यांच्या विषयी थोडक्यात माहिती लिहा.

**उत्तर** - हंबीरराव मोहिते हे निर्णय घेणे आणि पराक्रम गाजवणे यात निष्णात होते.छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेल्या स्वराज्यातील ते १६७४ पर्यंत सेनापती होते.त्यांनी गाजवलेल्या शौर्यामुळे खुश होऊन छत्रपती शिवाजी महाराजांनी त्यांना 'हंबीरराव'ही पदवी बहाल करून सेनापतीचे सरसेनापती केले.

संभाजीराजे यांच्या राज्याभिषेकानंतर हंबीररावांनी अनेक ठिकाणी स्वाऱ्या केल्या,अनेक युद्धे जिंकली.अनेक शत्रूंना हैराण करून सोडले.शत्रूंवर हल्ले करून पराक्रम गाजवले.अनेक शत्रूंचा पराभव केला.

**प्रश्न ३. पुढील वाक्ये वाचा व वाक्यांचे प्रकार ओळखून लिहा.**

१. तुझे गाव कोणते आहे?

**उत्तर** - प्रश्नार्थी वाक्य

२. मी रोज सकाळी लवकर उठतो व अभ्यास करतो.

**उत्तर** -संयुक्त वाक्य

३. जे चकाकते,ते सोने नसते.

**उत्तर** - मिश्र वाक्य

४. मुलांनो,चांगला अभ्यास करा.

**उत्तर** - आज्ञार्थी वाक्य

५. तो रोज व्यायाम करत नाही.

**उत्तर** - नकारार्थी वाक्य

६. शाबास! छान काम केलेस.

**उत्तर** -उद्गारार्थी वाक्य

७. जेव्हा मनात येईल,तेव्हा मी अभ्यास करीन.

**उत्तर** - मिश्र वाक्य

८. मी आज व्यायाम करणार आहे.

**उत्तर** - विधानार्थी वाक्य

**S.Teacher** **HOD** **Co –Ordinator** **Principal**